मंत्रालयीन विभागातील सचिवांच्या
कामकाजाचा आढावा घेणे व आस्तीची
पदे कमी करणेबाबत.

C-19

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : संकीर्ण-२००७/५४६/१८ (र.व का.),
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक ८ सप्टेंबर २०१०

**शासन निर्णय**

मंत्रालयीन विविध विभागातील सचिवांकडे असलेल्या कामकाजाचा आढावा घेऊन त्यांचेकडील विषयाचे फेरवाटप करणे व आस्तीची पदे कमी करणे इ.बाब शासनाचे विचाराधीन होती. त्या संदर्भात खालील प्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे:-

(१) सचिव, रोजगार व स्वयंरोजगार हे पद रद्द करण्यात येत आहे आणि त्या सचिव पदाचे कामकाज त्यांच्या क्षेत्रीय यंत्रणेच्या कामकाजासह सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने रोजगार व स्वयंरोजगार विभागातील लघुलेखक निम्नश्रेणी-१, रोखपाल (लिपिक व टंकलेखक)-१,देयक रोखपाल (लिपिक-टंकलेखक)-१, शिपाई/नाईक-१, वाहनचालक-१ अशी ५ पदे मिळून एकूण ६ पदे रद्द करण्यात येत आहेत.

(२) सार्वजनिक आरोग्य विभागातील सचिव व आयुक्त, कुटूंब कल्याण यांचे पदनाव " सचिव-२, सार्वजनिक आरोग्य विभाग असे करण्यात येत आहे.

(३) संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान या पदाचे पदनाम बदलून आयुक्त, कुटूंबकल्याण व संचालक राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन असे करण्यात येत आहे.

(४) संचालक, व्यवसाय शिक्षण हे आयुक्त रोजगार व स्वयंरोजगार यांच्या पर्यवेक्षीय नियंत्रणाखाली काम करतील.

उपरोक्त विषयीचे याआधीचे आदेश अधिक्रमीत करुन सदरहू शासन निर्णयाची अंमलबजावणी दि.१ ऑक्टोबर २०१० पासून अंमलात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashatara.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१००९०९१५०५०८००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( जे. पी. डांगे )
मुख्य सचिव

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव
सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.मुख्य सचिव यांचे सचिव
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
सचिव,रोजगार व स्वयंरोजगार, मंत्रालय, मुंबई

प्रधान सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,
संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, मुंबई, (सचिव, सार्वजनिक आरोग्य) यांचेमार्फत.
संचालक, व्यवसाय शिक्षण , रोजगार व स्वयंरोजगार
आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार
सर्व विभागीय आयुक्त
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई/ पोलीस महानिरीक्षक
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, निवडणूक आयोग, मुंबई ,
प्रबंधक, मूळ व न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायाल, मुंबई,
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग ,
महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई. (यांना प्रसिध्दीसाठी)
<u>निवड नस्ती/१८.</u>